# प्रेस नोट

दि.३/१०/२०१७

पुणे शहर पोलिसांतर्फे बडीकॉप, पोलीसकाका व सिटीसेफ हे उपक्रम राबविण्यात येत आहेत. #WeMakePuneCitySafe या मोहिमेअंतर्गत सदर उपक्रमाबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करण्यासाठी दि.०३/१०/२०१७ रोजी पुणे शहर पोलीसांतर्फे पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर येथुन रोड रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रॅली करिता रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर, रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे,रविंद्र सेनगावकर,अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे , साहेबराव पाटील, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे, श्रीमती नताशा पुनावाला, चेअरमन, विनु पुनावाला फाऊंडेशन, श्री.जगदीश बालाजी राव, वेंकीज इंडिया लि., श्री.कृष्णकुमार गोयल,कोहीनुर इन्स्टिट्युट, श्री.अनिल व्हाबी,डायरेक्टर,फिनोलेक्स इंडस्ट्रीज्, श्री.राजेश उत्तमचंदानी, डायरेक्टर एस.एस.के.ग्रुप हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी सर्व उपक्रमांकरिता आपले सहकार्य तसेच शुभेच्छा दिल्या.

रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे यांनी पुणे पोलिसांच्या तीन उपक्रमाबाबत थोडक्यात माहिती दिली. पुणे शहर पोलीसांद्वारे **'बडीकॉप'** हा नोकरपेशा महिला सुरक्षेसंबंधीचा उपक्रम सुरु करण्यात आला असुन अतितातडीच्या प्रसंगी बडीकॉप हे WhatsApp किंवा फोन याव्दारे संबंधित महिलेने संपर्क केल्यानंतर तात्काळ मदतीसाठी हजर राहतील. शाळा व महाविदयालयामधील विदयार्थ्यांना संकट काळात तात्काळ कायदेशीर मदत करण्यासाठी व व त्यांचे मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी **'पोलीसकाका'** हा उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक शाळा व कॉलेज साठी पोलीसकाका यांची नेमणुक करण्यात आलेली असुन विदयार्थ्यांनी अडचणींच्या वेळी त्यांचेशी संपर्क साधल्यानंतर त्यांना मदत पुरविण्यात येत आहे.

पुणे शहरातील सर्व नागरिकांसाठी **'सिटीसेफ'** हे ॲप सुरु करण्यात आले असुन अतितातडीच्या प्रसंगी, संकटसमयी त्याव्दारे पोलीसांशी संपर्क साधल्यानंतर तात्काळ पोलीस मदत पुरविण्यात येईल. सर्व नागरिक, महिला, विदयार्थी यांनी सदर उपक्रमांचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन पोलीस आयुक्त, पुणे यांनी केले आहे.

या रॅलीव्दारे हे उपक्रम सर्व जनतेला माहिती होण्याकरिता हा प्रयास आहे असे सांगुन सर्व नागरिकांना आपले शहर सुरक्षित करण्याकरिता हातभार लावावा अशी विनंती केली. फर्ग्युसन कॉलेज कडील विदयार्थ्यांनी सर्व उपक्रमांवर पथनाट्य सादर केले. सदर वेळी वाहतुक विभागाकडुन जनजागृतीपर एका चित्रफितीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच यावेळी सिस्का ग्रुप तर्फे बीटमार्शल्स् करिता १५० मोबाईल्स्चे वाटप करण्यात आले. या प्रसंगी शाळा, कॉलेज चे विदयार्थी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर रॅलीमध्ये बीट मार्शल्स्, वाहतुक मार्शल्स, दामिनी मार्शल्स्, महिला पोलीस अधिकारी त्याप्रमाणे ओला, उबर व हर्ले डेव्हीडसन या कंपन्यांची वाहने देखील सामील होती. सदर रॅलीची सुरुवात पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर येथुन होवुन जंगली महाराज रोड- एफ.सी.रोड- संचेती चौक-आर.टी.ओ.- एम.जी.रोड. या मार्गाने बी.जे.मेडिकल कॉलेज ग्रांऊड येथे संपविण्यात आली.